# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ४९९१ /२०१९ पुणे शहर, दिनांक ०३/०६/२०१९

**विषय :- रमजान ईद : २०१९ निमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल करण्याबाबत.**

------००------

दिनांक- ०५/०६/२०१९ रोजी (चंद्र दर्शनानुसार जाहीर केलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर किंवा पुढे) रमजान ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामुहिक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यावेळी ईदगाहचे जवळपास मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते. त्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सदर परिसरातील वाहतूक **आवश्यकतेनुसार** तात्पुरती खालील प्रमाणे बंद व वळविण्यात येणार आहे.

**गोळीबार मैदान,ईदगाह** या ठिकाणी दिनांक ०५/०६/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून नमाज पठण पुर्ण होईपर्यंत सदर ठिकाणी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **आवश्यकते** नुसार वाहतुकीस बंदी करण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरुन जाणा-या वाहनचालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

१. गोळीबार मैदान चौकातून स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा नमाजपठणाच्या वेळी बंद करण्यात येणार आहे.

**पर्यायी मार्ग-** गोळीबार चौकातून डाव्याबाजूस वळून सीडीओ चौक पुढे उजवीकडे वळून गिरीधर भवनचौक पुढे उजवीकडे वळुन सेव्हन लव्हज चौकातुन इच्छितस्थळी जाणे.

२. सीडीओ चौक ते गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक नमाज पठण काळात सकाळी ०७.०० ते १०.०० वा. चे वेळेत पुर्णता बंद करण्यात येईल.

**पर्यायी मार्ग-** लुल्लानगरकडुन येवुन खाण्या मारुती चौकाकडे जाणारी वाहतुक खटाव बंगला चौक-नेपीयर रोड-मम्मादेवी चौक किंवा वानवडी बाजार चौक-भैरोबानाला येथून किंवा गिरीधर भवन चौकातून इच्छितस्थळी जाणे.

३. सेव्हन लव्हज चौक कडून गोळीबार मैदानकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येणार आहे.

**पर्यायी मार्ग-** सॅलेसबरी पार्क-सी.डी.ओ. चौक- भैरोबानाला येथुन इच्छितस्थळी जाणे.

४. सोलापूर रोडने मम्मादेवी चौक येथे येणारी वाहतुक ही गोळीबार चौकाकडे जाणारा मार्ग बंद करण्यात येणार आहे.

**पर्यायी मार्ग-** मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा कमांड हॉस्पीटल मार्गे डाव्हर्शन करुन पुढे

इच्छित स्थळी किंवा नेपअर रोडने पुढे सीडीओ कडे.

५. भैरोबानाला ते गोळीबार मैदानकडे जाणारी वाहतुक भैरोबानाला येथे बंद करुन एम्प्रेसगार्डन व लुल्लानगरकडे वळविण्यात येईल.

**पर्यायी मार्ग-** प्रिन्स ऑफ वेल रोडने किंवा भैरोबानाला -वानवडी बाजार चौक येथून इच्छितस्थळी.

६. कोंढवा परीसरातून गोळीबार मैदानकडे येणा-या सर्व जड मालवाहतुक वाहने, जड प्रवासी बसेस,प्रवासी एस टी बसेस, पीएमटी बसेस यांना प्रवेश बंद करण्यात येईल. सदर वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करुन लुल्लानगर चौकातुन भैरोबानाला चौक किंवा गंगाधाम चौकातुन इच्छितस्थळी जाणे.

याखेरीज शहरातील अन्य भागातील ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार असल्याने सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी वाहतुक पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.